आपल्या वाचनाचा, आतल्या वाचनाचा...
आपलं महानगर | my महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघ अभियांत्रिकीत 'इंडस्ट्री कनेक्ट'



**नाशिक ।** के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था, नाशिकच्या एमसीए विभागातर्फे इंडस्ट्री कनेक्ट २०२५ चे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात ३५ सीईओ, २० प्राध्यापक व विभागप्रमुख तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक आयटी असोसिएशनचे अध्यक्ष मकरंद सावरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विभागप्रमुख डॉ. वंदना बागल यांनी एम. सी. ए. विभागाच्या उपक्रमांचा आढावा घेत केली, तर प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी संस्थेची व प्लेसमेंटबद्दल माहिती दिली.

चर्चेदरम्यान दीपक जैन (डाटाग्रीड), डॉ. उदय वाड, श्याम कुवार (नेटवीन), मतीन शेख (टेकशॉट), अदिती श्रीवास्तव (टीसीएस) व आदर्शजित पनिकर (डेकिमल पॉईंट ॲनाटिक्स) यांनी शैक्षणिक आणि औद्योगिक अपेक्षांतील दरी, नोकरीयोग्यता, प्रमाणपत्रांचे महत्त्व, आवश्यक कौशल्ये आणि चॅटजीपीटीसारख्या एआय साधनांचा प्रभाव यावर मार्गदर्शन केले. चर्चेचे संयोजन ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी केले. के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी स्वागत केले. संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी आभार मानले.

Nashik Edition
Nov 21, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com